प्रकरण : २

महाराष्ट्र शासनाचा रोजगार हमी योजनेचा कायदा

प्रकरण : २

महाराष्ट्र शासनाचा रोजगार हमी योजनेचा कायदा

प्रस्तावना :

भारतातील दारिद्रय निर्मूलनाचा प्रश्न हा प्रामुख्याने बेरोजगारांशी निगडित आहे. ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने उपजीविकेचे ते महत्वाचे व एकमेव साधन आहे. शेतात मिळणाऱ्या हंगामी कामामुळे ग्रामीण भागातील शेतमजूर, अल्पभूधारक व कोरडवाहू भागातील शेतकरी यांना वर्षभर रोजगार पुरविला जाऊ शकत नाही. अवर्षणाच्या काळात दुष्काळी भागातील जनतेची परिस्थिती अधिक हालाखीची होते. यावर मात करण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी योजना महत्वपूर्ण ठरते. महाराष्ट्र सरकारची रोजगार हमी योजना गरीबी व बेकारीवर मात करून खेड्याचा विकास साधण्याचा एक चांगला मार्ग ठरतो.

स्वातंत्र्य सैनिक व महाराष्ट्रविधान परिषदेचे अध्यक्ष कै. वि. स. पागे यांच्या विशेष प्रयत्नातून रोह्यो जन्माला आली. पागे यांनी अनेक वर्षे अभ्यास करून खेड्यातील गरीबांना कामाचा हक्क व संरक्षण देण्याच्या हेतूने आणि गरीबांच्या श्रमातूनच गावाचा विकास साधण्यासाठी रोह्योचा आराखडा तयार केला. १९६५ साली सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात विसापूर या गावी रोजगार हमी योजना प्रयोगिक स्वरूपात राबविण्यात आली. १९७२ च्या महाराष्ट्रातील तीव्र दुष्काळाच्या परिस्थितीत वि. स. पागे यांच्या अथक् प्रयत्नानंतर व त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी जनतेची मागणी व भावनांची दखल घेऊन १५ कलमी कार्यक्रमाच्या अंतर्गत १ एप्रिल १९७२ पासून रोजगार हमी योजना सुरू केली. राज्य शासनाने ''मागेल त्याला काम व कामाप्रमाणे दाम'' या तत्वावर रोह्यो अधिनियम १९७७ मध्ये अस्तित्वात आणला. हा कायदा २६ जानेवारी १९७९ पासून अमलात आला. ग्रामीण भागातील श्रमिकांना रोजगाराची हमी मिळाली. ग्रामीण श्रमजीवी जनतेच्या चळवळीतून या योजनेचा जन्म झाला आहे. हा कायदा करून महाराष्ट्र शासनाने देशात एक पुढाकाराचे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्रातील गरीबांना काम मागण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला. लोकशाही राज्यपध्दतीमध्ये 'काम करण्याचा हक्क' नागरिकांना देणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य म्हणून ओळखले जाऊ लागले. ग्रामीण भागातील गरीबी हटविणारी महाराष्ट्र सरकारची योजना आहे.[१]

वि. स. पागे आणि रोजगार हमी योजना

१९६५ मध्ये सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात 'एकात्मिक ग्रामीण विकास' हा कार्यक्रम प्रायोगिक स्वरूपात राबविण्यात आला. या योजनेसाठी तासगावच्या परिसरातील वेरळा नदी आणि कपूर ओढ्याकाठची ११ गावे निवडण्यात आली. त्यामध्ये गावचा सरपंच, निरनिराळ्या सोसायट्यांचे चेअरमन, सदस्य आणि शेतकऱ्यांचे दोन प्रतिनिधी यांची समिती असावी असे ठरले.

ही योजना सुरू असतानाच दुर्बल घटकांपैकी अकुशल कामगारांच्या समस्याही त्यावेळी ग्रामीण अर्थव्यवस्थेचे व ग्रामीण प्रश्नांचे सखोल ज्ञान असलेले महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती श्री. वि. स. पागे यांना भेडसावू लागल्या होत्या, कारण बाराही महिने सर्वांना काम मिळू शकत नव्हते. याबाबत काय करता येईल याचाही विचार पागेसाहेबांच्या मनात घोळत होता. या लोकांसाठी एक खास योजना तयार केली. यास 'पागे योजना' म्हणतात. 'पागेयोजने' तूनच ''रोजगार हमी योजनेची' संकल्पना पुढे आली.

मागेल त्याला काम
त्याचा योग्य दाम
आठवड्यातून एकदा पगार आराम

असा फलक तासगाव तालुक्यातील विसापूरच्या ग्रामपंचायतीच्या इमारतीवर २ ऑक्टोबर १९६९ या दिवशी लावण्यात आला. तो मुहूर्त साधूनच तासगाव तालुक्यातील विसापूरमध्ये रोजगार हमी योजनेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. त्या ऐतिहासिक कार्यक्रमाच्यावेळी योजनेचे जनक व विधान परिषदेचे तत्कालीन सभापती वि. स. पागे यांनी तपशीलवार माहिती अधिकाऱ्यांकडून आल्यानंतर पंचायत समितीचे तत्कालीन सभापती देशभक्त शंकरराव कुत्ते (वकील), उपसभापती बी. पी. पाटील, विसापूर गावांतील कार्यकर्ते शंकरराव माने व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी यांची सभा घेऊन या कार्यक्रमाचा आराखडा तयार केला. रोजगार हमी योजनेबाबतची माहिती प्रतिनिधिक स्वरूपात विसापूर मधून ही योजना कशा स्वरूपात राबविता येईल याबाबत सर्व तपशील शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावात नोंदविण्यात आला होता. या कामास सुरूवात करण्याकरिता शासनाने खर्चाकरिता एक लाख रू. निधी सुरूवातीच्या काळात मंजूर करावा असे मत मांडले होते. सरकारने ही योजना मंजूर करण्याआधी पागेसाहेबांनी सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुखांची एक बैठक बोलावली. यावेळी या योजनेस, विरोध दर्शविला गेला. सरकारी यंत्रणेतर्फे ही योजना सुरू केल्यास गावातील मजूर काम न करता पैसे मिळविण्याची ही संधी सोडणार पण या सहज साध्या उत्पन्नाच्या

मार्गामुळे ग्रामीण भागात शेतीला मजूर मिळणे कठिम होईल असे मत त्यांनी मांडले व भ्रष्टाचारास ही चालना मिळेल अशी मते व्यक्त केली.

आपल्या सहकाऱ्यांची मते एकूण पागेसाहेब नाराज झाले आणि म्हणाले, ''खून दरोड्यासारखे गुन्हे करून तुरूंगात सजा भोगणाऱ्या गुन्हेगारांना त्यांच्या आवश्यकतेचा परिपूर्ण विचार करून आपण सर्व कार्यकर्ते खर्च मंजूर करतो. पण जी माणसे कष्ट करून पैसे मिळविण्याकरिता झगडत आहेत त्यांचा विचार मात्र कोणीच करत नाही. ही खेदाची बाब आहे.''

अशा पध्दतीने वि. स. पागे यांच्या अथक प्रयत्नातून विसापूरची 'रोजगार हमी योजना' १९६९ मध्ये प्रायोगिक स्वरूपात सुरू झाली. योजनेच्या पथदर्शक प्रकल्पाची अमंलबजावणी सुरू झाल्याने विसापूर हे गाव राज्यभरात प्रसिध्द झाले. सुरूवातीला गायरानात ताली टाकून घायपात लावण्याचा पहिला कार्यक्रम राबविण्यात आला. त्यानंतर बंधारे दुरूस्ती, रस्ते आदि कामे घेण्यात आली. या कार्यक्रमाला मजुरांची संख्या कमी असल्याने मंजूर झालेल्या पैशामध्ये रोजगार हमी योजनेचा प्रयोग संपन्न झाला. रोजगार योजना सुरू झाल्यानंतर गावाला अनेक अभ्यासक आणि कार्यकर्त्यांनी भेट दिली.[२]

रोजगार हमी योजना म्हणजे (कै.) पागे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या चिंतनातून साकारलेला विचार होता. 'प्रत्येक धडधाकट व्यक्तीला त्याने मागणी करताच काम पुरविणे हे सरकारचे कर्तव्य आहे', असा विचार साम्यवादात मांडला जात असे, मात्र वारकरी संप्रदायाची परंपरा लाभालेल्या पागे यांनी रोजगाराची हमी देणारा सिध्दांत गांधीवादी विचारांच्या चौकटीत बसवला.

शेतावरील रोजगाराची संकल्पना प्राचीन काळातही महाराष्ट्रात होती. सुमारे दीड हजार वर्षांपूर्वी संकलित झालेल्या 'गाथा सप्तशती' या प्राचीन प्राकृत ग्रंथात शेताच्या राखणीला नेमलेल्या अहिरांचा उल्लेख आहे. युरोपात मात्र औद्योगिक क्रांतीनंतर रोजगाराची संकल्पना पुढे आली, कारण कामगारांची गरज त्यावेळी भासू लागली होती. 'वैयक्तिकदृष्ट्या एखादया व्यक्तीला एखादा कामधंदा किंवा आर्थिक लाभाचा व्यवसाय मिळणे म्हणजे रोजगार' अशी अर्थशास्त्राला अनुसरून व्याख्या होते. रोजगार करू इच्छिणाऱ्यांच्या तुलनेत त्याची संधी कमी असेल; तर बेरोजगारी निर्माण होते. आर्थिक विचारांत बेरोजगारीकडे दुर्लक्ष होते. अमेरिका आणि युरोपला १९२९ च्या जागतिक महामंदीने बेजार केले. त्यावेळी विख्यात अर्थशास्त्रज्ञ केन्स यांनी मांडलेली रोजगार मीमांसा क्रांतीकारक ठरली. अमेरीकेचे तत्कालीन अध्यक्ष रूझवेल्ट यांनी केन्सच्या सिध्दांताचा आधार घेतच नवे न्यू डिल धोरण मांडले.[३]

आधुनिक अर्थशास्त्रात प्रामुख्याने शहरी बेरोजगारीच्या प्रश्नांचा विचार होता. गांधीजींना मात्र सर्वप्रथम ग्रामीण भागांतील बेरोजगारीबद्दल विचार केला. पागे यांनी गांधीवादाचीच वाट पुसत रोजगार हमी योजनेची संकल्पना मांडली. अल्पभूधारक शेतकरी आणि भूमिहीन शेतमजुरांना त्यांच्या गावातच काम उपलब्ध करून दिले, तर त्यांचे शहराकडे होणारे स्थलांतर थांबेल, असे त्यांचे मत होते. योजनेबद्दल त्यांचे जवळजवळ वीस वर्षे चिंतन सुरू होते.

'माऊली' या नियतकालिकाच्या २० फेब्रुवारी १९४९ च्या अंकात त्यांनी 'काम करण्याचा हक्क' या शीर्षकाचा लेख लिहिला होता. त्यात त्यांनी 'स्वराज्याचे सुराज्य किंवा रामराज्यात रूपांतर होण्यासाठी प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत. ग्रामीण भागाकडे अधिक लक्ष देऊन तेथे कामाची अधिक संधी निर्माण केली पहिजे. त्यासाठीचे प्रयत्न कायदेचक्रात फिरणारी एकटी नोकरशाही करू शकणार नाही. त्यागी आणि देशभक्त तरूणांचाही त्यासाठी पुढाकार हवा.' असे म्हटले होते. भारतात स्वातंत्र्यानंतर सुराज्य निर्माण करणे, ही काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते यांची जबाबदारी आहे, असे पागे यांचे मत होते.

रोजगार हमीच्या पूर्वतयारीसाठी तासगाव, सांगली, मुंबई अशा अनेक बैठका झाल्या. त्यास ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील यांची प्रेरणा व प्रोत्साहन होते. पागे, माजी आमदार गणपतराव कोळी, शंकरराव कुत्ते, कृषिभूषण प्र. शं. ठाकूर आणि ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य पी. बी. पाटील अशा कर्त्या आणि जाणत्या मंडळींच्या विचारमंथनातून या योजनेचे स्वरूप साकार झाले. योजनेचे प्रत्यक्ष विधेयक तयार करताना ५६ देशांतील कायदा आणि घटनांचा अभ्यास करण्यात आला होता. विसापुरात योजनेचा फलक १९६९ च्या गांधी जयंतीदिनी लागला; मात्र तिला प्रत्यक्ष मंजुरी मिळाली ती दहा वर्षांनी. योजनेच्या मंजुरीनंतर आचार्य विनोबाजी रोजगार हमी योजनेबद्दलची हकीकत ऐकल्यावर हर्षभरित झाले आणि म्हणाले, ''रोजगार हमीच्या या कायदयाबद्दल भारत आणि महाराष्ट्र सरकार काहीही देऊ दे; मात्र गांधीवाद सरकारच्या गळी उतरवणारा माणूस म्हणून मी पागे यांना महाराष्ट्र रत्न किताब देतो.'' लोकनायक जयप्रकाश नारायण यांनीही रोजगार हमी योजनेबद्दल पागे यांचे कौतुक केले.[३]

वि. स. पागे रोजगार हमी योजनेचे जनक

पुरोगामी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना संविधानात अंतर्भूत करण्यात आलेला 'रोजगाराचा हक्क' हा सिध्दांत व्यवहारांत येत नव्हता ही एक खंत होती. महाराष्ट्र शासनाला

अशा प्रकारची जबाबदारी घेणे हे साहस वाटत होते. 'सनदी यंत्रणा' ही 'रोजगाराची हमी' स्वीकारल्यामुळे येणाऱ्या प्रचंड आर्थिक जबाबदारीच्या आकडेवारीमुळे शासनकर्त्यांना सल्ला देण्याचे साहस करू शकत नव्हती. महाराष्ट्र शासन कर्त्यांचा व 'सनदी सेवक' यंत्रणेच्या गळ्यांत ही घंटा बांधण्याचे साहस करणे जरूरीचे होते व हे साहस करण्याचे भाग्य त्यांच्या वाट्याला आले. ते त्यामध्ये यशस्वी झाले व म्हणून रोजगार हमी योजनेचे जनक म्हणून ते ओळखले जावू लागले.

पागेजींच्या या सिध्दांताच्या बांधिलकीला अध्यात्माचे अधिष्ठान आहे. कायदेव्यवहारांचे सखोल ज्ञान, सर्वचक पक्षांतील कार्यकर्त्यांशी चर्चा, विचारविनिमय करून सहमती प्राप्त करून घेण्याचे लोकशाहीतील कौशल्य आणि पारदर्शक व्यक्तिमत्व या सर्व गुणसंपत्तीच्या जोरावर 'रोजगार हमी कायदयाला' ते राज्यकर्त्या पक्षासह विरोधी पक्षांची सहमती प्राप्त करून घेवू शकले ही वस्तुस्थिती आहे. त्याचबरोबर सनदी सेवक यंत्रणेला ही ते पटवून देवू शकले. 'रोहयोची' सुरूवात हा महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा एक सामाजिक प्रयत्न होता. महाराष्ट्रातील परंपरेमुळे राजकीय, सामाजिक मानस तयार होतो. हे मानस वैधानिक रूपांत साकार करण्यासाठी सृजनशील प्रयत्नांची गरज होती. पागेजींनी ही गरज पूर्ण केली म्हणून ते योजनेचे 'जनक' म्हणून ओळखले जावू लागले. ही लोकमान्यता म्हणजे 'रोहयो' विषयीच्या कार्याला महाराष्ट्रातील जनतेने दिलेली पावती असे लोकमान्यतेचे वर्णन करता येईल.[४]

पागेजी एक 'क्रियावान' असे विचारवंत होते. पागेजींच्याकडे या योजनेचे जनकत्व दिले जाते ते या निर्णय प्रक्रियेत सर्वांना सभागी करून घेण्याच्या त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण पध्दतीमुळे. यामध्ये सत्ताधारी पक्षाचा जसा सहभाग होता तसेच विरोधी पक्षांचा, सामान्य कार्यकर्त्यांचा सहभाग अधिकारी वर्गांचा सहभाग होता. पागेजींनी राष्ट्राला वारंवार हेच नवे राष्ट्रदर्शन दिलेले आहे. समाजवादी विचारांचे प्रगत राज्य म्हणून संपूर्ण देशाने महाराष्ट्राकडे पहावे असाही पागेसाहेबांचा दृष्टिकोन होता. दारिद्रय निमुर्लनाच्या अनेक योजना महाराष्ट्रात शासनामार्फत कार्यान्वीत करण्यामध्ये पागेजींचा सिंहाचा वाटा होता. गांधीवाद हे पागेजींच्या जीवनाचे सूत्र होते. महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनताभिमुख लोकशाहीचा महिमा व श्री. वि. स. पागे यांचे सातत्यपूर्ण अथक् प्रयत्न व त्यांच्यासारखेच राष्ट्रीय चळवळीतून पुढे आलेले व ग्रामीण गरिबांशी नाळ व तुटलेल्या मंडळींशी त्यांना मिळालेली साथ यामुळेच ही योजना प्रत्यक्षात येवू शकली.[५]

अन्न, वस्त्र, दान मान । पोटीच्या कळवळ्याने जाणं ।।
करावे दीनांसी अर्पण ।। हा सधर्म जाण सर्वांचा ।। एकनाथ.

महाराष्ट्राचे थोर विचारवंत, स्वातंत्र्यसेनानी, रोजगार हमी योजनेचे प्रमुख प्रवर्तक. 'रोहयोचे प्रारूप, त्यासंबंधीचा कायदा, त्यासंबंधीची यंत्रणा, त्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद वरपासून खालपर्यंतची कारभाराची साखळी रोजगार हमीत दयावयाचा कामाचा मजुरी मोबदला याबाबतीतला मानदंड इत्यादी तपशीलवार बाबींकडे लक्ष देऊन रोजगार हमी सुरू करण्याच्या कामी आणि गतिमान करण्याच्या कामी पागेजींनी जीवाचे रान केले. आणि देशात रोजगार हुकूमी रीतीने कसा दयावा याचा आदर्शही घालून दिला. महाराष्ट्रातील जनतेला रोटी रोजींचा अधिकार मिळवून देण्यात पागेजी यशस्वी जाले. त्यामुळे पागेजींना 'रोजगार हमी योजने' चे 'जनक' म्हटले जाते.[६]

रोजगार हमी योजनेची सुरूवात

ग्रामीण भागातील बेकारांना काम दयावे या कल्पनेला जुलै १९६९ साली काही खेड्यांच्या पातळीवर अत्यंत मर्यादित स्वरूपात आकार देण्याचा प्रथम प्रयत्न झाला. १९७१-७२ मध्ये पडलेल्या दुष्काळात ग्रामीण जनतेवर बेकारी व उपासमारीचा प्रसंग आला. दारिद्र्याने पिडलेल्या ग्रामीण जनतेचे जीवन असहय झाले होते. मोठ्याप्रमाणावर स्थलांतर होत होते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी २८ मार्च १९७२ पासून राज्याच्या ग्रामीण भागात सर्वत्र ही योजना लागू करण्यात आली. वि. स. पागे आणि इतरांचे अनेक वर्षांचे प्रयोग, अभ्यास व तळमळ, डाव्यांचा दबाव, तीव्र दुष्काळ आणि नक्षलवाद फैलावण्याची भीती या सर्वांच्या फलस्वरूप १ मे १९७२ मध्ये रोहयो महाराष्ट्रात अस्तित्वात आली. बेकारी निर्मूलन हे या योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य होते. दुष्काळपीडीत जनतेला त्यामुळे प्रतिष्ठेने जीवन जगण्याचा दिलासा मिळू लागला. मार्च १९७२ मध्ये या योजनेला राज्यव्यापी स्वरूप देताना 'काम हा अधिकार' आहे असे मान्य न करता शेतीत किंवा नित्याच्या सरकारी कामात रोजगार न मिळाल्यास काम देण्याची सोय करण्यात येईल असे सांगण्यात आले. १ एप्रिल १९७२ पासून १५ कलमी कार्यक्रमांच्या अंतर्गत राज्यव्यापी स्वरूप देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पुढची दोन वर्षे राज्यभर मोठा दुष्काळ पडला व त्यामुळे दुष्काळ निवारण्याचे काम हेच शासनाचे मुख्य काम झाले. १९७४ साली शासनाने स्थगित केलेल्या योजनेला पुनः जीवीत केले. व त्याला आजचा आशय व आकार दिला. ते देण्यात १९७२-७३ साली राज्यभर शेतमजुरांनी जी जागृती दाखविली, संघटना बांधली व काम मिळविण्यासाठी व कामाच्या जागी सवलतीसाठी जो नेटाचा संघर्ष केला त्याचा वाटा फार मोठा आहे. महाराष्ट्र शासनाला खेड्यातील श्रमिक जनतेच्या या नव्या जागृतीची

जाणिवांची व त्यांच्या संघटित सामर्थ्याची नोंद घेणे भाग होते. म्हणूनच २० डिसेंबर १९७४ रोजी सदनात या योजनेसंबंधी निवेदन करतांना महाराष्ट्र शासनाने सांगितले की, ''खेडे भागातील बेरोजगारी आणि अपुरा रोजगार ही आपल्या आर्थिक गरजांची ठराविक वैशिष्ठे आहेत. आपल्या कृषी उत्पादनावर याचा अनिष्ठ परिणाम होत असल्यामुळे हा प्रश्न तातडीने सोडविणे आवश्यक आहे. म्हणूनच रोजगार हमी योजना ही केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे तर सर्व देशासाठी एक अत्यंत महत्वाची अशी योजना आहे.[७] सरकारचे असे मत होते की, 'खेडे भागातील बेरोजगारी म्हणजे आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला एक गंभीर धोकाच आहे ही बाब लक्षात घेता रोहयोचे महत्व वादातीत आहे. आणखी एका कारणाने या योजनेला राष्ट्रीय महत्व प्राप्त झालेले आहे. कारण ही योजना संख्येने सर्वात मोठ्या असलेल्या परंतु अत्यंत दुर्बल घटकांचे म्हणजेच भूमिहीन मजुरांच्या हिताचे संरक्षण करणारी अशी योजना आहे. ही योजना पूर्णपणे यशस्वी व्हावी असेच या सदनातील सर्व पक्षांना वाटते. त्याचप्रमाणे प्रशासकीय अकार्यक्षमता, निधीची कमतरता, राजकीय मतभेद व सामाजिक कार्यकर्त्याची उदासीनता यामुळे ही योजना बारगळू नये किंवा अपयशी होऊ नये असे सदनाचे मत आहे.''[८]

''रोजगार हमी योजनेच्या अमंलबजावणीत शेतीच्या कामावर व शेती विकासावर अनिष्ट परिणाम होऊ नये. आपल्या राष्ट्रीय जीवनासाठी शेतीचे महत्व अनन्य साधारण आहे. त्यामुळे रोजगार हमी योजनेचा परिणाम शेतीवर होऊ नये अशी सदस्यांची इच्छा आहे. पण याबरोबरच किमान शेतमजुरीचे तत्व व मजुरासाठी मिळविलेला कामाचा हक्क याचाही भंग होता कामा नये. यासाठी कलेक्टरने या दोहोमध्ये समतोल साधावा व योजनेच्या प्रत्यक्ष अमंलबजावणीचा दोहोपैकी एकावरही परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी असे या सदनाचे मत आहे. शेतीच्या कामासाठी मजुरांची आवश्यकता लक्षात घेऊन रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांनी काम देण्यास नकार दिला तरी ज्यांना काम मिळू शकत नाही अशांना शेतीच्या कामात पूर्णवेळ काम व किमान मजुरी मिळेल याची दक्षता जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली पाहिजे.''[९]

२० डिसेंबर १९७४ रोजी त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी सदनात केलेले निवेदन त्यापूर्वी शासनाने जी भूमिका घेतली होती त्याच्या संदर्भात महत्वाचे आहे. नोव्हेंबर १९६९ मध्ये तासगांव ब्लॉकच्या दहा गावात याचा विस्तार करण्यात आला व मजुरीचे दर त्याच कामासाठी इतरत्र जे दर असतील त्यापेक्षा १० टक्के कमी असावेत असे आदेश देण्यात आले. नोव्हेंबर १९७० मध्ये या योजनेचा पुनः

विचार करत असतांना असे स्पष्ट करण्यात आले की, ही योजना म्हणजे कामाचा हक्क नव्हे. ही बेकारांना मदत देणारी मात्र योजना आहे. मजुरीचे दर इतर कामापेक्षा शे. ५ टक्के कमी असावेत हे बंधन टाकण्यात आले. मजुरीचे दर शेतीचा हंगामा नसतांना मजुरीचे जे कमीत कमी दर असतील व जे काम दिले ते करावे लागेल व अंतर कितीही असो जेथे काम दिले तेथे जावे लागेल असे स्पष्ट करण्यात आले. शासनाची ही काम देणे म्हणजे मजुरांवर जणू काही उपकार करणे आहे ही ताठर भूमिका व १९७४ च्या निवेदनांत मजुरांच्या कामाच्या गरजेवर भर आहे व हमी योजना राबविली तर शेतीला माणसे मिळणार नाहीत या प्रचाराला उत्तर आहे. तसेच या निवेदनांत मजुरांना शेतीवर व हमी कामावर किमान वेतन हे मिळालेच पाहिजे यावरही भर आहे.[१०]

१९७२-७३ चा भयानक दुष्काळ, हरित क्रांतीचा डोलारा महाराष्ट्रात किती ठिसूळ पायावर उभा आहे याची तीव्र स्वरूपांत आठवण करून देणारी घटना होती. दुष्काळाची तीव्रता ओसरत असतांना शासनाने ६ ऑगस्ट १९७३ ला सर्क्यूलर काढले. त्यात त्याने दुष्काळाच्या काळात दररोज ४० लाखापेक्षा अधिक लोक कामावर होते असे सांगून म्हटले की, ''जलसिंचनाच्या मर्यादित सवलतीमुळे राज्याची मोठ्या प्रमाणावर कोरडवाहू शेती संबंधित उद्योगात ग्रामीण मजूरांना समाविष्ट करून घेण्याची क्षमता मर्यादित आहे.''

कामाची गरज असलेल्या सोळा लक्ष मजुरांनी आपली नांवे नोंदविल्याचा उल्लेखही त्या सर्क्युलरमध्ये आहे. एवढ्या प्रचंड प्रमाणावर लोकांना नियमित रोजगार पुरवावा लागेल हे जाणूनच शासनाने ४ जून १९७५ रोजी निरनिराळ्या व्यावसायिकांवर, धंदयावर व नोकऱ्यांवर एक विशेष रोजगार हमी कर लावला व त्याच्या उत्पन्नातून रोजगार हमी योजनेचा खर्च भागविण्याची तरतूद केली.[१०]

''महाराष्ट्र रोजगार हमी योजना'' कायदयाची घोषणा

महाराष्ट्रातील 'रोजगार हमी योजना' हा भारतीय आर्थिक विकासाच्या कार्यक्रमातील व इतिहासातील एक महत्वाचा टप्पा आहे. दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीतून जनतेला सावरण्यासाठी रोजगार हमी योजनेचा जन्म झाला. जेव्हा विशिष्ठ लाभासाठी गरिब आणि श्रीमंत स्पर्धा करीत असतात तेव्हा ते लाभ श्रीमंताकडे जाण्याची शक्यता जास्त असते. खेड्यातील गरीबांना 'कामाचा हक्क' व संरक्षण देण्याच्या हेतूने कै. वि. स. पागे यांनी अनेक वर्षे अभ्यास करून रोहयोचा आराखडा बनवला. १९७२ च्या

महाराष्ट्रातील तीव्र दुष्काळाच्या परिस्थितीत रोहयो महाराष्ट्रात सर्वप्रथम राबविली गेली आणि १९७४ नंतर रोहयो एक स्थिर, सर्व महाराष्ट्रभर राबविली जाणारी योजना म्हणून स्वीकारली गेली. रोजगार हमी योजनेला महाराष्ट्र विधानसभेने १९७७ रोजी कायदेशीर स्वरूप दिले. ''मागेल त्याला काम व काम प्रमाणे दाम'' या तत्वावर आधारित ''महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम'' १९७७ मध्ये अस्तित्वात आला. १९७८ मध्ये केंद्र शासनाची मान्यता मिळाली. २६ जानेवारी १९७९ पासून ''महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम'' अमलात आला.[१२]

लोकशाही राज्यपध्दतीमध्ये संमिश्र स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेमध्ये अशा प्रकारचा काम करण्याचा हक्क नागरिकांना देणारे महाराष्ट्र हे केवळ भारतामध्येच नव्हे तर जागतिक स्तरावरील पहिले राज्य म्हणून ओळखले जावू लागले.

रोजगार हमी योजना ही ग्रामीण भागातील गरीबी हटविणारी महाराष्ट्र सरकारची योजना आहे. खेड्यातील श्रमाची कामे करणारे गरीब, मजूर, भूमिहीन व लहान शेतकरी आणि दुष्काळ किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणाने बेकार असलेल्या सर्वांसाठी कायमस्वरूपी रोजगार पुरविणारी ही योजना राबविली जात आहे. खेड्यातील बेकार, गरिबांना रोजगार पुरवून त्यातून कुटुंबांचा, गावाचा व ग्रामीण भागांचा सगळ्या बाजूंनी विकास व्हावा, तसेच गरीबांना आधार देवून त्यांची ताकद वाढावी अशी रोहयोची मांडणी आहे. त्यांच्या श्रमातून ग्रामीण भागातील उत्पादन साधनांची उत्पादकता वाढवून ग्रामीण मजुरांना बेकार राहावे लागणार नाही असेही आश्वासन या योजनेत आहे. ग्रामीण भाग आणि 'क' वर्गीय नगरपालिकेच्या क्षेत्रातल्या कामाची गरज असलेल्या आणि कष्टाचे काम करण्याची तयारी असलेल्या अकुशल स्त्री-पुरुषांना उत्पादक रोजगार मिळवून देणे हा रोहयोचा मुख्य उद्देश आहे. कामाची हमी अकुशल कानाच्या पुरती मर्यादित आहे. रोहयो ही श्रीमंताच्या पैशातून गरिबांसाठी राबविली जाणारी योजना आहे.[१३]

महाराष्ट्र रोजगार हमी योजनेची ठळक वैशिष्टे

मागेल त्याला काम :-

रोहयोचे काम १८ वर्षे पूर्ण केलेल्या खेड्यातील तसेच 'क' दर्जाच्या नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही स्त्री-पुरुषाला मिळू शकते. गरीबी, दुष्काळ, शेतीचे किंवा दुसरे काम मिळत नाही अशावेळी खेड्यातील कोणीही कामाची मागणी करून काम मिळवू शकतो. एखादया कुटुंबात कुणीच कमावणारे

नसेल तर १५ ते १८ वर्षातील मुला-मुलींना देखील रोहयोचे काम मिळू शकते.

कामाची हमी :-

रोहयोचे काम मागितल्यावर ते खात्रीने मिळणार अशी हमी महाराष्ट्राच्या सरकारने दिली आहे. काम मागणाऱ्या ग्रामीण मजुरांची संख्या मोठी असली तरी खात्रीने ५०/६० दिवस काम मिळेल अशी व्यवस्था महाराष्ट्र सरकारने केली आहे. दुष्काळ असेल किंवा मोठी गरज असेल तर आणखीही काम पुरेशा रोहयोच्या मागण्या करून मिळवता येते.

कष्टाचे (श्रमप्रदान) काम :-

रोहयोचे काम हे शारिरीक कष्टाचे, श्रमाचे काम आहे. गरिबांना काम मागणाऱ्या प्रत्येक खेडूताला रोजगार पुरविणायासाठीच रोहयो तयार झाली आहे. खेड्यातील मुबलक श्रमशक्तीचा विकासासाठी वापर हे रोहयोचे उद्दीष्ट आहे.

उत्पादक काम :-

रोहयोचे काम हे केवळ उत्पादक स्वरूपाचे असते. कामातून दुसरे काम निर्माण व्हावे असा त्याचा उद्देश आहे. समजा रोहयोतून गावतळ्याचे काम झाले तर त्यामुळे पाणी गावतळ्यात साठेल. त्याचा शेतीला उपयोग होईल यामुळे शेतीतील रोजगारात / कामात वाढ होईल. मासेमीरींची नवी सोय उपलब्ध होईल.

खेड्याच्या मालकीची साधने निर्माण करणारे काम :-

रस्ते, विहिरी, गावतळी, पाझरतलाव, पाटबंधारे, वनतळी ही सर्व गावाची संसाधने आहेत. या संसाधनांमुळे गावाची प्रगती होते. अशी संसाधने निर्माण करणारे काम रोहयोतून घेतले जाते.

दुष्काळ हटविणारे काम :-

दुष्काळाची झळ पोहोचू नये अशी कामे रोहयोतून करणे महत्वाचे मानले जाते. तलाव, पाझरतलाव, गावतळी, वनतळी, बंधारे ही जलसंधारणाची व मृदसंधारणाची कामे जमिनीवरील व जमिनीखालील पाण्याची पातळी वाढविणारी असल्याने त्यातून दुष्काळ हटविणे, पाणी टंचाई कमी करणे शक्य होते.

खेड्याचा विकास घडविणारे काम :-

रोहयो केवळ गरिबांचीच योजना नाही. दुष्काळ हटविणारे, खेड्याच्या मालकीची साधने निर्माण करणारे तसेच उत्पादक काम हाती घेऊन रोहयो खेड्याचा संपूर्ण विकास साधू शकते. अशा कामातून मजुरांना मजुरी मिळतेच पण जमिनीची धूप रोखणे, पाण्याचा साठा वाढविणे, अंतर्गत व बाहय रस्त्यांची बांधणी करून शहरांशी संपर्क व व्यापार वाढविणे, शेतीचा विकास साधणेही शक्य होते.

गावातच काम :-

रोहयोची कामे मागितल्यावर शक्यतो मागणी करणाऱ्याच्या गावात किंवा गावाजवळच काढली जातात. त्यामुळे कामाची टंचाई असेल तेव्हा खेडूतांना शहरात जावे लागत नाही. शहरात जाणे टाळले गेल्यामुळे भाडेखर्च वाचतो, स्त्रियांनाही सहजपणे कामाला जाता येते. शहरातील राहण्या-जेवणाचा खर्च वाचविणे शक्य होते, मुलांच्या शाळा बुडत नाहीत. काम मागणाऱ्या व्यक्तीला कामाची पसंती करता येत नाही. रोजगार शोधणाऱ्यास राहत्या ठिकाणापासून ५ कि.मी. त्रिज्येत जर रोजगार उपलब्ध नसेल, तर ५ कि.मी. च्या बाहेर जिल्ह्यात कोठेही रोजगार देण्यात येतो.[१४]

महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायदा

'महाराष्ट्र रोजगार हमी योजना' कायदा हा १९७७ साली मंजूर केला. २६ जानेवाली १९७९ रोजी अमलात आला. रोजगार हमी योजना कायदयातील महत्वाच्या तरतुदी व शासकीय आदेश खालीलप्रमाणे -

रोहयोसाठी कामगार म्हणून नोंदणी : ओळखपत्र घेणे

ज्याचे वय १८ किंवा अधिक असेल त्याला काम मागण्याचा हक्क आहे. ज्या कुटुंबात कोणीच प्रौढ कमावती व्यक्ती नसेल तेथे १५ वर्षे वयाच्या मुलालाही नावं नोंदणीसाठी अर्ज करता येईल. नोंदणी केली नसेल तर काम मागण्यास अडचणी येतील. शिवाय काम दिले नाही तर बेकार भत्ता मागण्याचा अधिकारही वापरता येणार नाही. नोंदणी झाल्यानंतर प्रत्येक कामगाराला ओळखपत्र मिळते. याशिवाय हजेरी पुस्तिका द्यावयाची व्यवस्था केली आहे. या हजेरी पुस्तिकेत दर मस्टरमध्ये हजेरी व वेतन यांची महिनेवार अशी पाच वर्षांची नोंद ठेवण्याची सोय आहे. रोहयोच्या कामाची मागणी गावचा तलाठी किंवा

ग्रामसेवक म्हणजेच नोंदणी अधिकारी किंवा तहसिलदार यांच्या ऑफिसमध्ये करू शकतो. रोहयो ही दुष्काळी योज्ना नसून ती बारामाही योजना आहे.[१५]

रोहयोच्या कामाच्या मागणीसाठी 'प्रोसीजर'

पूर्वी पाच पन्नास लोकांनी सामुहिक अर्ज केला किंवा मोर्चा काढला तरी भागत असे आता सरकारचा असा आग्रह आहे की, ज्याला काम पाहिजे असेल त्याने प्रत्येकाने वैयक्तिकपणे स्वतंत्र अर्ज केला पाहिजे. असा अर्ज केला नाही तर बऱ्याच ठिकाणी पूर्वीप्रमाणे कामावर घेतले जाते परन्तु सरकारवर तसे बंधन नाही व मजुरांची संख्या जशी वाढत जाईल तशी कायदयाची अमंलबजावणी कडक होत राहिल. तेव्हा अर्ज देणे आवश्यक आहे. कामाच्या मागणीचा अर्ज हयासाठीही आवश्यक आहे की. जर अर्ज देउनही अर्जदारास सात दिवसात, काम दिले नाही तर त्या अर्जाच्या आधारावर बेकार भत्ता मागता येतो. कामाची मागणी करण्यासाठी नुमाना क्र. ४ चा अर्ज करावा. असा अर्ज दिल्यानंतर १५ दिवसांच्या आत संबंधित मजुराला त्याच्या गावी कोणत्या कामावर जावे याची सूचना गेली पाहिजे असा कायदा आहे. त्याचबरोबर सरकारी अधिकारी जिल्ह्यात जेथे काम दाखवतील तेथे सात दिवसांच्या आत मजुराने रूजू झाले पाहिजे असाही कायदा आहे. जर त्याने त्या साईटवर जाण्यास नकार दिला तर त्याला तीन महिन्याकरिता बेकार भत्ता मागता येणार नाही. शेतीचा सीझन असेल तर अधिकारी काम नाकारू शकतात. कित्येक वेळेस असेही घडते की जेथे काम दाखविले तेथे काम घेणारा कोणीच अधिकारी नाही. अशा परिस्थितीत त्या गावच्या सरपंचाकडून तसे प्रमाणपत्र घ्यावे. कधी असेही घडते की मजूर साईटवर जातात पण अधिकारी मजुरांची संख्या जास्त आहे. म्हणून किंवा इतर कारणाने काम नाकारतात अशा स्थितीत त्या अधिकाऱ्याकडून लेखी घ्यावे व तहसीलदाराला तसा अर्ज करावा.[१६]

नोंदणी नसलेल्यांना काम मिळणेबाबत

रोजगार हमी कायदयात नोंदणीची तरतूद आहे. परंतु ती काम देण्याबाबतची पूर्व अट नाही आणि म्हणून नोंदणी न केलेला मजूरही कामासाठी आला तर त्या कारणाने त्याला काम नाकारू नये. परन्तु कामाच्या जागेवर असणाऱ्या अधिकाऱ्याने त्याच्याकडून अर्जावर सही अंगठा होऊन त्याचे नावं नोंदवून घ्यावे त्यावर त्याला ओळखपत्र दिले जावे.[१७]

रोहयोवरील कामाचे नियम

मजुरांचा समूह किंवा गँग बनविणे :-

रोहयोत गँगमनची किंवा मेटची पध्दत नाही. अंगावरचे काम मजुरांच्या गँगलाच दिले जाते. ही गँग कामाच्या प्रकारानुसार करता येईल. ती लहान व मजुरांना सोईस्कर अशी असावी. तसेच गँगमधील मजुरांची संख्या कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १२ असावी असे स्पष्ट निर्देश शासनाने दिले आहेत.[१८]

हत्यारे व अवजारे यांचा पुरवठा :-

रोहयो कामावरील मजुरास कामासाठी लागणारी हत्यारे व अवजारे शासनाने विनामूल्य पुरवावयाची आहेत. मजुरांनी आपली स्वतःचीच हत्यारे व अवजारे वापरल्यास त्याचे भाडे प्रती अवजार प्रती व्यक्ती दर दिवसाला दिले जातात. मजुरांनी स्वतःची हत्यारे किंवा अवजारे आणली नाहीत म्हणून अंमलबजावणी अधिकारी त्यांना कामावरून परत पाठवू शकत नाही. दररोज एक रुपया भाडे दिले जाते.[१९]

कामाच्या जागी दरफलक :-

मराठीत लिहिलेला दर फलक कामाच्या जागी सर्वांना दिसेल अशा प्रकारे लावला पाहिजे. त्यात मजुरीचे दर, युनिट लिड व लिफ्टच्या दरांसह स्पष्ट लिहिलेले असावेत. तसेच १ घनमीटर नमुना कामाचे मोजमाप व ते काढण्याची पध्दत दरफलकावरच मजुरांच्या माहितीकरिता प्रदर्शित करणे आवश्यक आहे. अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी दरफलक मजुरांना समजावून सांगितला पाहिजे.[२०]

रोहयोच्या कामावरील मजुरांना सोई सुविधा

निवारा :-

रोहयोच्या कामाच्या ठिकाणी दुपारच्या सुट्टीत मजुरांना विश्रांतीसाठी सावलीची व्यवस्था केली पाहिजे. कामावरील मजुरांची संख्या आणि जेवढ्या अंतरात काम चालू आहे त्याचा विचार करूनच मांडवबांधणी करण्यात यावी.

16094

पिण्याच्या पाण्याची सुविधा :-

मजुरांना कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी पुरविले जाते. पाणी आणणाऱ्या वेगळ्या स्त्री-पुरुषांची नेमणूक करून त्यांना रोजंदारीवर मजुरी देणे प्रसंगी बैलगाडीतून पाणी आणणे रोहयोमध्ये मान्य आहे.

लहान मुलांसाठी पाळणागृहे :-

लहान मुले असलेल्या स्त्रियांनाही रोहयोच्या कामावर जाता यावे यासाठी कामाच्या ठिकाणी पाळणागृहाची म्हणजेच लहान मुलांना सांभाळण्याची व्यवस्था केलेली असते. त्यासाठी पाळणा, सावली असलेला निवारा व सांभाळ करणाऱ्या रोजावर नेमलेल्या बायांची सोय करणे आवश्यक असते. सामान्यपणे मध्यम व मोठ्या कामावर अशी सोय अलिकडे उपलब्ध करून दिली जाते. यामुळे पाळणाघरातील बाईच्या हाती मूल सोपवून लेकुरवाळ्या बाया बिनघोर रोहयोचे काम करू शकतात.

जखमींना वैद्यकीय मदत व मृतांना भरपाई :-

रोहयोच्या कामावर काम करताना अपघात झाल्यास आणि आवश्यकता असल्यास त्याला सर्वांत जवळच्या प्राथमिक आरोग्यकेंद्रात किंवा रूग्णालयात दाखल करण्याची जबाबदारी अंमलबजावणी अधिकाऱ्यावर राहिल. त्याला मोफत उपचारशुश्रूषा मिळू शकेल, तसेच तो रूग्णालयात असेपर्यंत तेथील त्याचा राहण्याचा, उपचाराचा व खाण्यापिण्याचा खर्च शासनातर्फे करण्यात येईल. या कालावधीत त्याला रोजंदारीच्या मजुरीच्या अर्धी मजुरी दररोज दैनिक भत्ता म्हणून मिळेल.

अशी व्यक्ती कामावरील अपघातामुळे मरण पावल्यास तिच्या वारसास सानुग्रह सहाय्य म्हणून जिल्हाधिकाऱ्यांतर्फे भरपाई म्हणून ५० हजार रुपये रोख (२००२) पासून देण्यात येतात. अशी व्यक्ती अपंग झाली तर शासनाने निश्चित केलेल्या दराने जिल्हाधिकारी ठरवतील त्याप्रमाणे भरपाई देण्यात येते. रोहयो मजुरांनी सोबत आणलेल्या मुला-मुलींना अपघात झाल्यास त्यांना रोहयो मजुरांप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात येते.

प्रथमोपचार :-

रोहयोच्या कामावर किरकोळ दुखापत झाली असता प्रथमोपचार करण्यासाठी औषधी साहित्य

उपलब्ध केले जाते.

प्रसुती काळातील सुविधा :-

रोहयोच्या कामावरील स्त्री मजुराने प्रसूतीपूर्वी वर्षभरात किमान ७५ दिवस काम केलेले असल्यास तिला प्रसतीसाठी १५ दिवस रजा देण्यात येते. या रजेच्या काळात तिला त्या परिमंडळात देय असलेल्या दरानुसार प्रतिदिनी मजुरीइतकी रक्कम सानुग्रह अनुदान देण्यात येते. जर ७५ दिवसांपेक्षा जास्त कान केले असल्यास पुढील प्रत्येक दिवसांसाठी १ दिवस अधिकची रजा व वेतन दिले जाते. सदर सवलत जास्तीत जास्त १५० दिवसांसाठी दिली जाते. म्हणजेच १५० दिवस काम केले असल्यास तिला ३० दिवसांच्या मजुरी इतके सानुग्रह अनुदान म्हणून दिले जाते. अशी कायदयातील तरतूद आहे.

कुटुंबनियोजनासाठी पगारी रजा :-

रोहयोच्या कामावर असणाऱ्या स्त्री मजुराने कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करून घेतली तर १४ दिवस, पुरुष मजुरास ७ दिवस आणि स्त्रीस तांबी बसविल्यास २ दिवस पगारी रजा सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात येते.

छावण्या व प्रवासभत्ता :-

रोहयोच्या कामावर येणारा मजूर हा लांबच्या गावाहून किमान ५ किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावरून आला असेल तर त्याला त्याच्या गावापासून प्रवासभत्ता म्हणून दिले जाते. तसेच कामाच्या ठिकाणी तात्पुरता निवारा त्यांना उपलब्ध करून दिला जातो.

रोहयोवर खडी फोडणाऱ्या मजुरांच्या डोळ्यांना इजा होऊ नये यासाठी तारेचे चष्मे पुरवले जातात.[२१]

मजुरांना मजुरी :-

रोहयोच्या काम रोजंदारीचे काम नाही; ते अंगावरचे काम आहे. मजूर जितके काम करतील त्याचे मोजमाप व प्रतीनुसार त्यांना मजुरी दिली जाते. गँगमधील स्त्रीपुरुष दोघांना सारखीच मजुरी दिली जाते. विविध कामांचे हे दर अशा प्रकार ठरविण्यात आले आहेत की, सर्वसामान्य व्यक्तिने रोज ७ तास काम केल्यास त्याला त्या भागातील शेतमजुरांस किमान मजुरी कायदयानुसार मिळणाऱ्या मजुरी एवढी मजुरी

मिळू शकेल. तथापि, याला धरण व बंधाऱ्याचे गॉर्ज फिलींग व मातीच्या भिंतींना दगडाचा आधार देणे, या कामाचा अपवाद केला आहे. हे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण होण्यासाठी ठेकेदारी पध्दतीने पूर्ण करून घेण्यात येते. त्यामुळे अर्धवट झालेली कामे पाण्याने वाहून जाण्याचा धोका टळतो. त्याचप्रमाणे कालव्याच्या कामासंबंधात खडक स्फोटाचे काम याला अपवाद आहे. वेळोवेळी जाहीर होणाऱ्या किमान वेतन दराप्रमाणे ते बदलण्यात यावे अशी स्पष्ट तरतूद रोहयो कायदयामध्ये केली आहे.[२२]

वेतनपत्रक व मजूरी वाटप :-

रोहयोखाली मजुरांनी केलेल्या कामाचे मोजमाप दर आठवड्याला केले जाते. मोजमाप करणाऱ्या कर्मचाऱ्याने प्रत्येक गँगला वेळापत्रक देऊन त्यात त्यांनी केलेल्या कामाचा तपशील मोजमापाच्या वेळेसच नोंदवून देणे आवश्यक आहे. मजुरीचे वाटप दर आठवड्यास व कोणत्याही परिस्थितीत पंधरा दिवसांचे आत झालेच पाहिजे. मजुरी वाटपास पंधरा दिवसांपेक्षा जास्त वेळ लागल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. मजुरीचे वाटप कामाच्या दिवशी व कामाच्या जागीच करणे आवश्यक आहे.[२३]

हजेरी व गैरहजेरी :-

अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा जास्तीत जास्त अर्धा तास उशीर झाला तरी त्याची पूर्ण दिवसाची हजेरी लागली पाहिजे. पण त्यापेक्षा जास्त उशीर झाल्यास अर्ध्या दिवसाचीच हजेरी लागेल.

काम सुरू झाल्यापासून एका महिन्याच्या कालावधीत मजूर काही आवश्यक कामाने एकूण फक्त सात दिवसच गैरहजर राहू शकतो. त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिल्यास त्याचा बेरोजगार भत्ता मिळविण्याचा हक्क तीन महिन्याकरिता नष्ट होते.[२४]

कामाचा आणेवारीशी संबंध नाही :-

पन्नास किंवा अधिक लोकांनी कामासाठी अर्ज केल्यास त्यांना काम दिले पाहिजे. परन्तु या अगोदर खालील गोष्टी पाहणे आवश्यक आहे. शेतीच्या गरजा, योजनांच्या किंवा रोहयो तहत घेतलेल्या कामाच्या गरजा, अपुऱ्या कामांच्या गरजा. या ठिकाणी पुरेसे मजूर उपलब्ध आहेत हे पहावे. परन्तु तालुक्यात पिकाची आणेवारी काय आहे याबद्दल रोहयो तहत काम देतांना विचार करण्याची गरज नाही.[२५]

शेतकऱ्यांना मोबदला :-

रोहयोच्या तहत रस्ते, पाझर तलाव इ. साठी घेतलेल्या शेतकऱ्यांच्या जमीनीचा मोबदला रोहयोच्या फंडातून करणे नियमबाह्य आहे. त्याचबरोबर हेही खरे आहे की अशा जमीनीचा मोबदला अनेक वर्षे दिला जात नाही. तेव्हा मजुरांना उत्पादक काम देणे कठिण होते, अनुउत्पादक कामे घेतली जातात. तेव्हा कामाचा आराखडा तयार करतानांच त्यात संबंधित खात्याने आपल्या फंडातून देण्याची तरतूद केली आहे.[२६]

रोहयोच्या कामावर यंत्राचा वापर व ६०:४० अट शिथिल करण्यासंबंधी

रोहयोचे काम हे विकासाकरिता आहेच पण त्याचा मुख्य उद्देश मजुरांना अधिकाधिक रोजगार निर्माण करून देणे हा आहे. रोहयोमध्ये म्हणूनच यंत्राचा वापर कमीत कमी केला जातो. कामाच्या एकूण खर्चापैकी कमीत कमी ५१% खर्च हा मजुरांच्या मजुरीवर खर्च होण्याचे बंधन रोहयोत आहे. यामुळे यंत्रांच्या वापरावर मर्यादा आल्या आहेत. रोहयोच्या कामावर यंत्राचा वापर करणे टाळता येत नसते. उदा. रस्ते तयार करताना ट्रॅक्टर, पाण्याचा टँकर, रोडरोलर यांचा वापर करावाच लागतो. पण जे काम नानवी श्रमाने करता येण्याजोगे आहे त्या कामाला मशीन किंवा यंत्रे लावता येत नाहीत. बुलडोझर, जेसीबी सारखी मोठी मशीन लावणे हा रोहयोतील गंभीर गैरप्रकार आहे. जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने यंत्रांचा वापर करू शकतात. यंत्राप्रमाणे रोहयोच्या कामावर कंत्राटदार, ठेकेदार यांनाही नाकारलेले आहे. रोहयोच्या कामात अमंलबजावणी अधिकारी व कामगार / मजूर यांच्यात कोणताही मध्यस्थ नसतो. ६०:४० ही अकुशल कामासाठी ६०% खर्च व ४०% खर्च यंत्रसामग्री व इतर सामान ह्यांसाठी केला पाहिजे हो अट १९८२ च्या रोहयो कायदयाने शिथिल केली.[२७]

रोहयोच्या कामाचे स्वरूप

रोहयोचे काम कोणते असावे हे ठरविण्याचा अधिकार मागणी करणाऱ्याला नसतो. तरीही गावांच्या गरजाप्रमाणे ग्रामसभेत चर्चा करून रस्ता, बंधारा, गावतळे यासारख्या कामाची मागणी आपल्याला करता येते. रोहयोमध्ये सामान्यपणे अंगमेहनतीची, खेडेगावात सामूहिक मालमत्ता / संसाधने विकसित करून विकासाला चालना देणारी अशी कामे काढली जातात. ज्यातून रोजगाराची निर्मिती होईल व मजुरांना कायम स्वरूपाचा अधिक रोजगार मिळू शकेल अशी उत्पादक कामे रोजगार हमी योजनेत प्राथमिकतेने

घ्यावयाची आहेत. उदा. जलसंधारणा व मृद संधारणाची कामे (बंधारा, नाला, बांध, कंटुर बंडिंग, दगडी बांध, पाझर तलाव, गावतळे, शेततळे, लघुपाटबंधारे, भूविकासाची कामे, खारजमिनीचा विकास, पूर नियंत्रण इ.) वनीकरण व सामाजिक वनीकरण, गावातील अंतर्गत रस्ते, इतर फळबाग विकास, जवाहर विहिरी, दलित समाजासाठी घरे बांधणे, ग्रामविकासाची कामे, एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास, सिंचन योजना, सर्वंकष शेतीसुधार इ. अकुशल : कुशल कामाचे प्रमाण ल. पा. तलाव, गावतलाव, मालगुजारी तलाव, वनतळी, गॅबियन बंधारे व रस्ते याकरिता आता ५१:४९ असे करण्यात आले आहे. उर्वरित कामासाठी अकुशल : कुशल प्रमाण पूर्वीप्रमाणेच ६०:४० ठेवण्यात आले आहे.[२८]

रोजगार हमी कामांचे नियोजन व आखणी

श्रमिकांसाठी जास्तीत-जास्त मजूर क्षमतेची कामे उपलब्ध करता येतील अशा प्रकारे योजना राबविण्यात येते. जिल्ह्यातील नेहमीच्या शेतीच्या कामांवर मजुरांअभावी विपरित परिणाम होणार नाही, याची काळजी घेतली जाते, तसेच इतर योजनांतर्गत किंवा योजनेतर कामे चालू असताना ही योजना अमलात आणली जात नाही. जिल्हाधिकारी जिल्ह्यासाठी १ आक्टोबर ते ३० सप्टेंबर या पुढील वर्षाच्या काळासाठी रोजगार हमी योजनेबाबत वार्षिक योजना तयार करतात. चालू कामांव्यतिरिक्त इतर मंजूर कामे योजनाही तयार ठेवण्याची जबाबदारी जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांवर टाकण्यात आली आहे.[२९]

रोहयोची कार्ययंत्रणा

कार्यक्रमावर परिणामकारक व सतत संपर्क व नियंत्रण राहण्यासाठी त्रिस्तरीय प्रशासकीय यंत्रणेची उभारणी करण्यात आली आहे.

राज्यस्तरावर नियोजन विभाग व रोहयो मंत्री यांकडे या कार्यक्रमाची सर्व सूत्रे आहेत. यात नियोजन प्रशासन, निधीची तरतूद, कार्यक्रमाचे सनियंत्रण व मूल्यमापन या बाबींचा अंर्तभाव होतो.

विभागीय पातळीवर महसूल विभागाचे आयुक्त, रोहयो उपायुक्त आपल्या ४,५ जिल्ह्यांच्या विभागातील रोहयो कामाचे नियोजन करणे, निधी पुरविणे. जिल्हाधिकाऱ्यांना वेळोवेळी अमंलबजावणीसाठी सूचना देऊ शकेल.

जिल्हापातळीवर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी रोहयो आपल्या जिल्ह्यातील रोहयो कामांची आखणी, नियोजन करणे, जिल्ह्यातील रोहयो कामांची अमंलबजावणी करणे.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

तालुका पातळीवर तहसिलदार आणि रोहयो ऑफिस यांच्यामार्फत तालुक्यातील रोहयो कामांची नीलप्रत बनविणे, मागण्या संकलीत करून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविणे, कामांना आदेश मिळविणे व यंत्रणा / विभागांना कार्यारंभ आदेश देणे. कामाचा समन्वय साधणे.

गावपातळीवर तलाठी हा गावातील मागणीप्रमाणे मजुरांची नोंद करणे, त्यांना ओळखपत्र देणे, रोहयोच्या मागण्या गोळा करणे, त्या तहसिल ऑफिसकडे पोचविणे इ. कार्ये करतात.

गावकऱ्यांनी मजुरांनी रोहयोच्या कामाची मागणी केल्यावर तलाठी त्यांच्या क्षेत्रातील गावांचे सर्व मागणी अर्ज एकत्र करून तहसिलदारांकडे पाठवतात. तहसिलदार या मागण्यांचा व दुष्काळ, टंचाई परिस्थितीचा अंदाज घेऊन या मागण्यांचे प्रस्ताव पंचायत समितीच्या मदतीने कलेक्टर कचेरीत पाठवितात. तेथून मंजुरी मिळाल्यावर तहसिलदार लघुपाटबंधारे, कृषि, वन, सार्वजनिक बांधकाम अशा विभागाच्या अधिकाऱ्यांना कार्यारंभ आदेश देतात. हे अधिकारी आपल्या हजेरी सहाय्यकांच्या मदतीने मागणी केलेल्या गावाच्या आसपास तेथील परिस्थितीचा अंदाज घेऊन व अभ्यास करून काम सुरू करतात. कान सुरू करण्याआधी ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, ग्रामसेवक यांच्याशी चर्चा होते. गावकऱ्यांना काम सुरू होणार याची माहिती दवंडीद्वारे अथवा ग्रामपंचायतीच्या फलकावर सूचना लिहून केली जाते.[३०]

रोहयोची मूल्यमापन व मार्गदर्शन यंत्रणा

रोहयोचे कामकाज सुरळीतपणे चालू आहे किंवा नाही, रोहयोच्या कामाचे लाभ गरिबांपर्यंत जातात ती नाही, रोहयोचा परिणाम कसा आहे हे अभ्यासणे. रोहयो अधिक चांगल्या रीतीने काम करावी या हेतूने अभ्यासावर आधारित मार्गदर्शन व सूचना करणे यासाठी चार पातळ्यांवरील रोजगार हमी योजना समित्या तयार केल्या आहेत.

राज्यस्तरावर रोहयो समिती :-

विधानसभा अध्यक्षांनी निवडलेले विदानसभेचे ११ सदस्य आणि विधानपरिषदेच्या सभापतींनी निवडलेले काही सदस्य यांची राज्य स्तरावरील रोहयो समिती तयार होते. आमदारांच्या या समितीचेच एक सदस्य तिचे प्रमुख म्हणून काम पाहतात. या समितीचे सदस्य आपल्याला नेमून दिलेल्या क्षेत्रातील रोहयोच्या कामांची पाहणी, मूल्यमापन करून अडचणी सोडविणारे व सुधारणा करणारे उपाय सुचवितात.

जिल्हा स्तरावरील रोहयो समिती :-

पालकमंत्री	-	अध्यक्ष
जिल्ह्यातील मंत्री / राज्यमंत्री	-	सहअध्यक्ष
एक खासदार	-	सदस्य
तीन आमदार	-	सदस्य
जि. प. अध्यक्ष	-	सदस्य
जि. प. बांधकाम समिती अध्यक्ष	-	सदस्य
मागासवर्गीय समाजाचे दोन सदस्य	-	सदस्य
अ शासकीय दोन	-	सदस्य
मजूर प्रतिनिधी / शेतमजूर संघाचे दोन प्रतिनिधी	-	सदस्य
मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद	-	सदस्य
जिल्हाधिकारी	-	सदस्य सचिव

पंचायत समिती स्तरावरील रोहयो समिती :-

पंचायत समिती क्षेत्रातील आमदार	-	अध्यक्ष
पंचायत समिती क्षेत्रातील विधान परिषद सदस्य	-	सदस्य
पंचायत समिती सभापती	-	सदस्य
मागासवर्गीय समुहाचे दोन सदस्य	-	सदस्य
अशासकीय असे दोन सदस्य	-	सदस्य
अशासकीय असे दोन सदस्य	-	सदस्य
रोहयोचे मजूर अथवा शेतमजूर संघाचे दोन प्रतिनिधी	-	सदस्य
एक महिला प्रतिनिधी	-	सदस्य
प्रकल्प अधिकारी	-	सदस्य
गटविकास अधिकारी	-	सदस्य
तालुक्याचे तहसिलदार (समिती अधिकारी)	-	सदस्य सचिव

ही समिती आपल्या पंचायत समिती क्षेत्रातील मजुरांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कामाचे नियोजन करणे, मजुरांना मजुरी व सोईसवलती मिळतात की नाही याची पाहणी करणे व आवश्यक त्या सूचना, उपाय जिल्हा रोहयो समितीकडे देणे ही काम करते.

स्थानिक पातळीवरील रोहयो समिती

देखरेख व कामावरील गैरप्रकारास, फसवणुकीस आळा घालण्यासाठी गाव अथवा कामाच्या ठिकाणी रोहयो समिती नेमली जाते. ज्या कामावर १०० पेक्षा अधिक मजूर काम करतात तेथेच ही समिती काम करणाऱ्या शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांकडून जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वानुमतीने तयार केली जाते. सरपंच, पोलिस पाटील, प्राचार्य, शिक्षक यापैकी दोन व्यक्ती सदस्य असतात.[३१]

निरीक्षण आणि दक्षता पथके

निरीक्षण व दक्षता कार्य विभागीय स्तरावर आयुक्तांकडे सोपविण्यात आले असून हे कार्य प्रत्येक विभागातील विशेष कार्य अधिकाऱ्यामार्फत करण्यात येते. या व्यतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार व कार्यान्वीत यंत्रणेचे पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी रोजगार हमी योजनेंतर्गतच्या कामांची ठरवून दिलेल्या मापदंडाप्रमाणे देखरेख व तपासणी करावी, अशी अपेक्षा आहे.

कुप्रवृत्ती कमी करण्यासाठी विभागीय आयुक्तांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. जिल्हा व विभागस्तरीय दक्षता पथके स्थापन करण्यात आलेली आहेत. कामगारांना ओळखपत्रेयुक्त मजुरी पुस्तिका देण्यात आल्या असून त्यात त्यांची उपस्थिती व मिळालेली मजुरी यांची नोंद कटाक्षाने करण्यात येते. यामुळेही अपप्रवृत्तीना आळा बसण्यास मदत होते.[३२]

रोहयोसाठी साधनसंपत्ती

रोहयो ही श्रीमंताच्या पैशातून गरीबांसाठी राबविली जाणारी योजना आहे. व्यवसाय, व्यापार व रोजगार यावरील कर, वाहनांवरील अतिरिक्त कर, विक्रीकरावरील अतिरिक्त कर, ओलिताखालील शेत जमिनीचा विशेष कर, जमीन महसुलावरील सरचार्ज, महाराष्ट्र बिगर निवासी नागरी जमिनी व इमारती यांवरील कर. दरवर्षी जवळपास १२०० ते १५०० कोटी रू. रोहयो फंडात जमा होतात. हे पैसे सरकारला

इतर गोष्टींवर खर्च करता येत नाहीत. रोहयोचे काम त्या प्रमाणात निघाले नाही तरी त्या वर्षीचा रोहयोचा फंड पुढील वर्षी वापरावा लागतो. त्या त्या वर्षीचा फंड सरकारने रोहयोत वापरला नाही म्हणून कोट्यावधी रूपयाचा रोहयो फंड सरकारकडे शिल्लक आहे.[३३]

रोहयो कामांना मंजूरी व अमंलबजावणी

जिल्हाधिकारी रुपये ५० लाख खर्चापर्यंतची कामे मंजूर करू शकतात व विभागीय आयुक्त रुपये ७५ लाखांपर्यंतची कामे मंजूर करू शकतात. ७५ लाखापेक्षा अधिक खर्चाची कामे राज्यशासनाकडून मंजूर करण्यात येतात.[३४]

राष्ट्रीय रोजगार हमी योजना आणि महाराष्ट्र रोजगार हमी योजना यांची तुलना

राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमध्ये प्रत्येक मजूर व्यक्तीला या योजनेखाली दररोज ६० रूपयांपेक्षा कमी मजूरी मिळणार नाही. ज्या राज्यामध्ये १९४८ च्या किमान वेतन कायदयाखाली शेतमजूरी ६० रुपयांपेक्षा जास्त वेतन असेल ते वेतन दिले जाईल. महाराष्ट्र रोजगार हमी योजनेमध्ये ४५ ते ५१ रुपये मजूरी दर आहे.

राष्ट्रीय रोहयोमध्ये प्रत्येक आर्थिक वर्षात किमान १०० दिवस अकुशल स्वरूपाच्या कामाची हमी देण्यात आली आहे. महाराष्ट्र रोहयोमध्ये ग्रामीण भागांमध्ये मागणीनुसार काम दिले जाते.

राष्ट्रीय रोहयोमध्ये ग्रामीण भागातील काम मागणाऱ्या प्रत्येक घरातील फक्त एक प्रौढ व्यक्तीला कामाची हमी देण्यात आली आहे. महाराष्ट्र रोहयोमध्ये घरातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीला कामाची हमी देण्यात आली आहे.

राष्ट्रीय रोहयो कायदयामध्ये ५० मजूरांनी मागणी केल्यानंतर, मजूरांना राहत्या घरापासून ५ कि.मी. आत काम देण्यात येईल. ५ कि. मी. बाहेर काम असल्यास १० टक्के अधिक रक्कम देण्यात येईल. महाराष्ट्र रोहयोमध्ये २५ मजूरांनी कामाची मागणी केल्यास काम देण्याची तरतूद आहे. राष्ट्रीय रोहयोमध्ये कामांवर मजूराला मृत्यू आला अगर कायमस्वरूपी अधू झाल्यास २५ हजार रूपये दिले जतील. महाराष्ट्र रोहयोमध्ये यासाठी ५० हजार रूपयांची तरतूद केली आहे. राष्ट्रीय रोहयोमध्ये उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या रोजगारापैकी किमान $^{१}/_{३}$ रोजगार महिलांना उपलब्ध करून दिला जाईल. महाराष्ट्र रोहयोमध्ये

तशी तरतूद नाही. राष्ट्रीय रोहयो हा कायदा अमंलबजावणी झाल्यानंतर देशातील २०० जिल्ह्यांमध्ये सुरूवातीला राबविण्यात आला आहे. महाराष्ट्र रोहयो कायदा अमंलबजावणी झाल्यानंतर महाराष्ट्रातील 'क' वर्गीय नगरपालिका व संपूर्ण ग्रामीण भागात राबविण्यात आली.

समारोप :-

महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचे जनक वि. स. पागे यांच्या अथक प्रयत्नातून महाराष्ट्र रोजगार हमी कायदा १९७७ मध्ये मंजूर झाला. या कायदयामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेला कामाचा हक्क प्राप्त झाला असून श्रमाची प्रतिष्ठा प्राप्त झाली. मार्गदर्शक तत्वांची अमंलबजावणी झाली. जगण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. ग्रामीण भागातील बेकारी व दारिद्रय कमि होण्यास मदत झाली आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायदा अस्तित्वात आल्यानंतर सार्वजनिक उत्पादक कामे निर्माण होऊन ओलिताखालील क्षेत्र वाढले आहे. ह्या कायदयामुळे मजुरांना दुष्काळ व टंचाई परिस्थितीत काम मागण्याचा अधिकार मिळाला आहे.

संदर्भग्रंथ

१. सावळे संजय - ''मागेल त्याला काम, रोजगार हमी योजना'', ग्रामीण गरीबांची अमृत योजना, वचन संस्था नाशिक, पृ. १.

२. कृषीभूषण ठाकूर प्र. शं. - कथा ही 'रोहयो' च्या जन्माची, नवे राष्ट्रदर्शन रोजगार हमी योजना, वाङमय प्रकाशन समिती मुंबई, १९९८, पृ. ९९-१०४, १०६-११०.

३. सहस्रबुध्दे चिंतामणी - दै. सकाळ (कोल्हापूर) सप्तरंग, 'रोजगार हमी योजनेचा जन्म', २८ मे २००६.

४. वै. पागे वि. स. - 'पागेजी रोजगार हमी योजनेचे जनक', वाङ्मय प्रकाशन समिती, पृ. ९-११.

५. डॉ. मंत्री ल. भा. - 'रोजगार हमी व नवी अंतर्राष्ट्रीय अर्थव्यवस्था', प्रबोधन प्रकाशन ज्योती, एप्रिल २००१, पृ. ४५-४६.

६. भारदे बाळासाहेब - 'लोकजगण्याहो अधिकार', वाङ्मय प्रकाशन समिती, १९९८, मुंबई, पृ. १३.

७. काँ. चौधरी चंद्रगुप्त - 'ग्रामीण श्रमिकांचे प्रश्न आणि रोजगार हमी योजना', महाराष्ट्र राज्य ट्रेड युनियन काँग्रेस प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ९.

८. ई. जी. एस. कॉम्पेंडम ऑफ ऑर्डरस, गर्व्हमेंट प्रेस १९८२, पृ. ८३८.

९. काँ. चौधरी चंद्रगुप्त - 'ग्रामीण श्रमिकांचे प्रश्न आणि रोजगार हमी योजना', महाराष्ट्र राज्य ट्रेड युनियन काँग्रेस प्रकाशन, औरंगाबाद, पृ. १०.

१०. उपरोक्त, पृ. ११.

११. देशमुख गणपतराव - 'रोजगार हमी योजना महाराष्ट्राची आणि केंद्र सरकारची', प्रबोधन प्रकाशन ज्योती, एप्रिल २००१, पृ. ११.

१२. पागे वि. स. - 'रोजगार हमी योजना सर्वसाधारण माहिती', 'नवे राष्ट्रदर्शन रोजगार हमी योजना, वाङ्मय प्रकाशन समिती मुंबई पृ. ७.

१३. उपरोक्त, पृ. ८.

१४. सावळे संजय - 'मागेल त्याला काम रोजगार हमी योजना', ग्रामीण गरीबांची अमृत योजना, वचन संस्था, नाशिक, पृ. २-४.

१५. नियोजन विभाग सर्क्युलर १०८२/सीआर/११४/डी-३७, २९ नोव्हेंबर १९८२ (सारसंग्रह, रोजगार हमी योजना)

१६. 'ग्रामायान', 'रोजगार हमी मार्गदर्शिका', पुणे पृ. १४-१५.

१७. नियोजन विभाग सर्क्युलर १०८२/सीआर/११४/डी-३७, १९८३.

१८. शा. प. नि. वि. क्र ईजीएस १०८१/१९/३३ दि. २३ जानेवारी १९८१.

१९. शा. नि. नि. वि. क्र ईजीएस १०८१/२७८/डी-३३ दि. २६-३-१९८१.

२०. शा. नि. नि. वि. क्र ईजीएस १०७५/ई एम पी (२) दि. २९ नोव्हेंबर १९७५.

२१. सावळे संजय - 'मागेल त्याला काम रोजगार हमी योजना', ग्रामीण गरीबांची अमृत योजना वचनसंस्था, नाशिक, पृ. १३-१४.

२२. 'ग्रामायान', 'रोजगार हमी', मार्गदर्शिका, पुणे पृ. १६-१७.

२३. उपरोक्त, पृ. १८.

२४. उपरोक्त, पृ. १९.

२५. २० सप्टेंबर व १४ फेब्रुवारी ७५ चे जी. आर. व १२ मार्च ७६ ईजीएस १०७६ तहत सूचना.

२६. शासन ठराव ईजीएस १०७५०/२९ नोव्हेंबर १९७५, सारसंग्रह, रोजगार हमी योजना १९७५, पृ. २३.

२७. शासकीय ठराव १०८२/८० डेस्क ३३/४ जुलै १९८२.

२८. देशमुख गणपतराव - रोजगार हमी योजना महाराष्ट्राची आणि केंद्र सरकारची, प्रबोधन प्रकाशन ज्योती, नोव्हेंबर २००५, पृ. १२-१३.

२९. उपरोक्त, पृ. १४.

३०. सावळे संजय - 'मागेल त्याला काम रोजगार हमी योजना', ग्रामीण गरिबांची अमृत योजना, वचनसंस्था नाशिक, पृ. ५-६.

३१. उपरोक्त, पृ. ७-८.

३२. उपरोक्त, पृ. ९.

३३. उपरोक्त, पृ. ५.

३४. देशमुख गणपतराव - रोजगार हमी योजना महाराष्ट्राची आणि केंद्र सरकारची प्रबोधन प्रकाशन ज्योती - नोव्हेंबर २००५, पृ. १५.

३५. प्रा. डॉ. पाटील जे. एफ. - राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ प्रबोधन प्रकाशन ज्योती - नोव्हेंबर २००५, पृ. ३१-३४.

THE DISTRICT IN MAHARASHTRA

FIG. 2



FIG. 3



H-747G. P. Z. P. POONA-1962

सोलापूर जिल्ह्याचा नकाशा



सांगोला तालुक्याचा नकाशा



G.P.Z.P. Poona. H/451-650-62.